# पुणे महानगरपालिका
# स्थायीसमिती
# कार्यपत्रिका क्र. ५६
# सभा क्र.०३, दिनांक १३/०४/२०२३ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची तहकूब सभा (गुरुवार, दि. ०६/०४/२०२३ रोजीची) गुरूवार, दि. १३/०४/२०२३ रोजी दुपारी ३.५० (तीन वाजून पन्नास मिनिटे) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे काही खाते प्रमुख उपस्थित होते.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

<u>दाखल विषय</u>

**विषय क्र. २०२३ त्वर्य**

कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रणाकरिता केलेल्या लॉकडाऊनमुळे पुणे शहरातील पुणे महानगरपालिकेच्या मालकीचे क्रीडा संकुले बंद असल्याने क्रीडा संकुलांची सदर कालावधीतील मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात जोडलेल्या (परिशिष्ठ अ प्रमाणे ) भाडे माफीकरिता होणारी रक्कम रूपये २,५३,३९,९६९/- यास मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र मआ/क्रिडा/१६२१, दि.२३/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २०२४ त्वर्य**

पुणे मनपाच्या कै. माणिकचंद नारायणदास दुगड हॉस्पिटल, बालाजीनगर, आऊटसोर्सिंगद्वारे चॅरीटेबल ट्रस्ट/ खाजगी वैद्यकीय संस्था / स्वयंसेवी संस्था यांना शासकीय दरात २८ वर्षे मुदतीच्या कराराने चालविणेस देणेस मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र मआ/आरोग्य/१६४०, दि.२९/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २०२५ त्वर्य**

पर्वतीस.नं. ६७/६८ येथील रामदेव बाबा क्रीडा संकुलकरिता व्यायाम साहित्य खरेदी करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.त्रिमुर्ती इंजिनियरिंग, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुगपर.रू. २९,२९,४००/- पेक्षा १%कमी )असल्याने त्यांचेकडून मा. महा.आयुक्त (वि) यांचे विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या कोष्टकानुसार र.रू. २९,००,१०६/- (सर्व करांसह) पर्यंत काम करून घेणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा, तसेच त्यापोटी होणारे बिल त्यांना अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचेजा.क्र मआ/भांडार/१६४१, दि.३१/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २०२६ त्वर्य**

स.नं.११४/११५ बाणेर येथे वर्किंग वुमन होस्टेल बांधणेकामी सर्वात कमी दराचे ठेकेदार मे. प्रशांत शशिकांत तळेकर यांचेकडून त्यांचे मुळ टेंडर दर ३०.३३% कमी दराने असल्याने त्यांचेकडून या कामाच्या पूर्वगणन रकमेपर्यंत म्हणजेच र.रू. ७४,८८,४१०/- पर्यंत (जीएसटी, रॉयल्टी व टेस्टिंग चार्जेससह) अधिक सिमेंट, स्टील यासाठी विशेष भाववाढ सुत्रानुसार येणारी रक्कम वसूल अथवा आदा करून येणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यास व त्यानुसार त्यांचेसोबत दुरूस्त करारनामा करणेसाठी कामी मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र मआ/भवन/१६४४, दि.३१/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २०२७ त्वर्य**

महर्षी हरकादास सांस्कृतिक भवन, हरकानगर, भवानीपेठ, पुणे येथील समाज मंदिराच्या ठिकाणी पुणे महानगरपालिका समाज विकास विभाग व स्वयंसेवी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक उपक्रम राबविणेसाठी मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र मआ/सविवि/१६४५, दि.३१/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २०२८ त्वर्य**

सुरक्षा विभागाकडील रक्कम रूपये २.५ कोटी बहुद्देशीय कामगारांच्या वेतन देयकाकरिता वर्गीकरणाने उपलब्ध करून खर्च करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र मआ/सुरक्षा/१६४७, दि.३१/३/२०२३ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सुरक्षा विभाग, मनपा प्रवेशद्वारावर प्रवेश नियंत्रक यंत्रणा राबविणे RE11D132A. | र.रू. २.५ कोटी | --- |
| सुरक्षा विभाग<br>सुरक्षा विभागामार्फत विविध ठिकाणीउदा. दवाखाने ,स्मशानभूमी, पाणी टाकी, इत्यादी बहुद्देशीय कामगारपुरविणे.RE11D130. | --- | र.रू. २.५ कोटी |

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २०२९ त्वर्य**

पुणे पेठ हडपसर, फा. प्लॉट क्र. ९८ अ अंतर्गत प्लॉट क्र.२८ चे लीजहोल्ड राईट्स हस्तांतरणास करणेकामी मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र मआ/माव्य/१६४८, दि.३१/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २०३० त्वर्य**

मौजे सुस येथे ग्रामदैवत भैरवनाथ मंदिराशेजारी सभा मंडप बांधणेसाठी र.रू. १०० लक्ष वर्गीकरणाने उपलब्ध करून देणेस मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र मआ/भवन/१६४९, दि.३१/३/२०२३ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| प्रकल्प विभाग, नदी पुनरूज्जीवन (पी.पी.पी./कर्ज/अनुदान/इतर वित्तीय माध्यमातून नदी व नदीकाठ विकसित करणे )CE20D219/L2-11 | र.रू. १०० लक्ष | --- |
| भवन विभाग<br>मौजेसुस येथेग्रामदैवत भैरवनाथ मंदिराशेजारीसभा मंडप बांधणे. | --- | र.रू. १०० लक्ष |

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**<u>कार्यपत्रिकेवरील विषय</u>**

**<u>उपआयुक्त विभागीय कार्यालय यांचेकामकाजाचा आढावा</u>**

**विषय क्र.२००७**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी व कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयांकडील दि. १/२/२०२३ ते दि.२८/२/२०२३ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उपआयुक्त परिमंडळ क्र.४, यांचे जा.क्र. उआप–४/७५८५, दि. २१/३/२०२३चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**<u>माहितीसाठी आलेले विषय</u>**

**विषय क्र.२००८**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि. ०१/०३/२०२३ ते दि. १५/३/२०२३ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.१/१६३७, दि. २९/०३/२०२३चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**<u>हिशोब तपासणीअहवाल</u>**

**विषय क्र. २००९**

कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील पेठ उंड्री, बालेवाडी, खराडी सन २०१९–२० व २०–२१ मधील आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/३३९८,दि. २३/३/२०२३ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रमांक २५, सन २०२२–२३ चा विचारासाठी.

**निर्णय– सदर विषय मा. ऑडिट उपसमितीकडे पाठविण्यात यावा.**

**<u>सर्वातकमी रक्कमेचे टेंडर्स</u>**

**विषय क्र.२०१०**

पथ विभाग झोन क्र.७ कार्यक्षेत्रात जी–२० परिषद अनुषंगे चौक, फुटपाथ, दुभाजक, इ. रंगरंगोटी करणे, दिशादर्शक फलक लावणे व तदनुषंगिक कामे करणे (भाग–१)कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सिद्धिविनायक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८४,७४,१५५/–पेक्षा३३.५५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ५६,३१,०७६/–पर्यंत काम करून घेणेस,अधिक जीएसटी र.रू. १५,२५,३४७=९०अशी एकूणर.रू. ७१,५६,४२३=९० पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीनुसार विशेष

भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचेजा.क्र.मआ/पथ/१६२४, दि. २७/३/२०२३ चे पत्र.
**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२०११**

नव्याने समाविष्ठ झालेल्या म्हाळुंगे येथील क्रिडा संकुल हद्द ते म्हाळुंगे गावठाणपर्यंत जाणारा मुख्य रस्ता सिमेंटचा करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.विवेक कळसकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ४१,२०,८१४/– पेक्षा३०.०६% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. २८,८२,०९७=३१ अधिक जीएसटी र.रू. ७,४१,७४७/–पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू.४९,९३८/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ८५,५००/– अशी एकूण र. रू. ३७,५९,२८२=३१ पर्यंत काम करुन घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीनुसार विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१६२५, दि. २७/३/२०२३ चे पत्र.
**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२०१२**

नानासाहेब परूळेकर शाळेशेजारील क्रीडा संकुलाचे स्थापत्य विषयक दुरूस्तीची कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या२ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रोहित कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ६७,७८,६९९/–पेक्षा३१.३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४६,५६,९६६=२१ अधिक जीएसटी र.रू. १२,२०,१६६/– अधिक मटेरिल टेस्टिंग चार्जेस र.रू. १०,८८५/– पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्राप्रमाणे व लेबर, मटेरिअल, पेट्रोल/डिझेलसाठी भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/भवन/१६२६, दि. २७/३/२०२३ चे पत्र.
**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२०१३**

प्रभाग क्र.१२ ड मधील शिवसेना प्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे बालनाट्यगृहाचे उर्वरित फायर फायटिंग विषयक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ल्यूमिनोसिटी इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ६१,७८,७४४/–पेक्षा१०.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ५५,६०,८६९=६० अधिक जीएसटी र.रू. ११,१२,१७४/– पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार लेबर, मटेरिअल, पेट्रोल/डिझेलसाठी भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/भवन/१६२७, दि. २७/३/२०२३ चे पत्र.
**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२०१४**

पथ विभाग झोन क्र.७ कार्यक्षेत्रात जी–२० परिषद अनुषंगे चौक डांबरीकरण करणे व तद्नुषंगिक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. सिद्धिविनायक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८४,३७,७८५/– पेक्षा२३.२०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ६४,८०,२१८=८८ पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र.रू. १५,१८,८०१=३० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ३०,०१५/– अशी एकूणर.रू. ८०,२९,०३५=१८ पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीनुसार विशेषभाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१६२८, दि. २७/३/२०२३ चे पत्र.
**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२०१५**

पथ विभागझोन क्र.७ कार्यक्षेत्रात जी–२० परिषद अनुषंगे चौक सुशोभिकरण, पदपथ दुरूस्ती व तद्नुषंगिक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. सिद्धिविनायक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८३,९९,७३२/–पेक्षा २७.९०% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ६०,५६,२०६=७७ पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र.रू. १५,११,९५१=७६ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू. ५८,३६८=६० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. २८,६१५/– अशी एकूण र.रू. ७६,५५,१४२=१३पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीनुसार विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१६२९, दि. २७/३/२०२३ चे पत्र.
**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२०१६**

बावधन खुर्द येथील सर्व्हे नं. २५,३८,४५,४७,४९,६७ तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र.४ ते मनपा हद्दीत पर्यंत रामनदीच्या कडेने मुख्य मलवाहिनी विकसित करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.के.खोसे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ४,८२,८८,६२५/–पेक्षा ३०.३३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ३,३६,४२,६८५=०३ व अधिक जीएसटी र.रू. ६०,५५,६८३=३० अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. २१,६४,६३२/– अधिक टेस्टिंग चार्जेस र.रू. ३,६९,४७३/– (पैकी हायड्रॉलिक

टेस्टिंग ही बाब ३०.३३% कमी निविदा दराने) अधिक थर्ड पार्टी कन्सल्टंसी र.रू. ४,८२,८८६/– असे एकूण र.रू. ४,२७,१५,३५९=३३ भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनि/१६३०,दि. २७/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२०१७**

पुणे शहरातील मुळा मुठा नदीतील जलपर्णी यांत्रिकी पद्धतीने आऊटसोर्सिंग तत्वावर काढणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. अंकिता इंजिनिअर्स यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८४,६७,४५२/–पेक्षा०.५९०% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ८४,१७,४९४=०३३ अधिक १८% जीएसटीसह होणाऱ्या एकूण रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करणेस आणि केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/पर्यावरण/१६३१, दि. २८/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२०१८**

पुणे शहरातील पाषाण तलावातील जलपर्णी यांत्रिक पद्धतीने काढणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. मोरया डेव्हलपर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८४,६७,६०३/–पेक्षा०.९९०% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ८३,८३,७७३=७३० अधिक १८% जीएसटीसह होणाऱ्या एकूण रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी काम करून घेणेस व करारनामा करणेस केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/पर्यावरण/१६३२, दि. २८/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२०१९**

पुणे मनपाच्या परिमंडळ क्र.३ मधील धनकवडी स्मशानभूमीमध्ये पर्यावरणपूरक ए.पी.सी सिस्टीमची उभारणी करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निकिता बॉयलर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे( पुर्वगणनपत्रक र. रु. २६,८५,९४९/– (१८ %जीएसटी सह) मधील निविदा र.रू. २२,७६,२२८/– (अधिक १८% जीएसटी) च्या ०२.००%कमी (तडजोडी अंती)दराने) असल्याने त्यांचेकडून र.रू. २२,३०,७०३=४४ अधिक १८% जीएसटी र.रू. ४,०१,५२६=६२ असे एकूण र.रू. २६,३२,२३०=०६ ( १८% जीएसटी सह ) चे पर्यंत काम करून घेणेस, सदरचे काम सुरू करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ईस्टेट) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१६३३, दि. २८/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.२०२०**

पुणे महानगरपालिकेच्या सर्व दवाखाने, रूग्णालये व प्रसुतिगृहांसाठी वैद्यकीय उपकरणे खरेदी करणे (निविदा क्र.१८सन २०२२–२३) कामी निविदा मागविली असता आलेल्या ९ निविदाधारकांपैकी सर्वात कमी दर देणारे पात्र निविदाधारक यांचेकडून मा.अति.महा.आयुक्त (ज)यांचे विषयपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे अ.क्र. १) ऑस्टीन हेल्थकेअर यांचेकडून रक्कम रू. ५,२१,६२५/– २) जिनोवा बायोटेक यांचेकडून र.रू. ५,९८,२००/– ३) क्रॉलीसर्ज सर्जिकल्स यांचेकडून र.रू. ३,४४,६३,०५०/– ४) चित्रासेल्स ॲन्ड सर्व्हिस यांचेकडून र.रू. १४,७८,०००/– ५)आर.एस.एंटरप्रायजेस यांचेकडून र.रू. १,०४,३०,०००/– असे एकूण जीएसटी करासहित रक्कम रूपये ४,७४,९०,८७५/– (अक्षरी रक्कम रूपये– चारकोटी चौऱ्याहत्तर लाख नव्वद हजार आठशे पंच्याहत्तर फक्त )पर्यंत वैद्यकीय उपकरणांची खरेदी करणेस व खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१६३९, दि. २९/३/२०२३ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२२–२३
RE17F133B
उपकरणे यंत्रसामुग्री पुणे शहरामध्ये हेल्थप्लॅन अंतर्गत रेफरन्स सेंटरमधील उपकरणे
खरेदी व इतर खर्ची लॅप्रोस्कोप इतर अनुषंगिक साहित्य खरेदी करणे.
मान्य तरतूद रक्कम रूपये – ५,००,००,०००/– पैकी ४,७४,९०,८७५/–

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**<u>संकीर्ण</u>**

**विषय क्र. २०२१**

पुणे पेठ वारजे स.नं.११/२/३ पैकी येथील मिळकतीमधील एस.टी.पी., एल.आर.टी, आणि २४ मी.डी.पी. रस्ता रूंदी बाधित क्षेत्र रोख रक्कम मोबदल्यापोटी ताब्यात घेणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१६३४, दि.२८/३/२०२३ चे पत्र.

१) वारजे स.नं.११/२/३ पैकी येथील मिळकतीमधील एस.टी.पी., एल.आर.टी, आणि २४ मी.डी.पी. रस्तारूंदी बाधित ११०० चौ.मी. जागेचा दिलासा रकमेसहित होणारी नुकसान भरपाई र.रू. २,८६,१२,७५२/– इतकी यापुर्वी मा.स्थायी समिती ठराव क्र.११५६, दि.०९/०२/२०२१ अन्वये मान्य केलेल्या श्री दिलीप मारूती चरवड व इतर ३ यांचेऐवजी

१.श्री. शंकर नामदेव पोळ , २. श्री.दत्तात्रय नामदेव पोळ, ३. श्री. बाळासाहेब नामदेव पोळ, ४. श्री. नंदकुमार नामदेव पोळ यांना अदा करणेस.

२) हस्तांतरण दस्त नोंदणीसाठी आवश्यक असणारी नोंदणी फी, मुद्रांक शुल्क यांचा खर्च पुणे महानगरपालिकेमार्फत करणेस.

३) जागेचा मोबदला आणि हस्तांतरण दस्त नोंदणीसाठी आवश्यक नोंदणी फी, मुद्रांक शुल्क यासाठी लागणारा खर्च राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेअंतर्गत मुळा–मुठा नदीसुधारणा कामे करणेकामी मैलापाणी योजना राबविणे (जायका) या सदराखाली अर्थशिर्षक क्र. ZE16C102/PR2-1 या मधून करणेस.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २०२२**

पर्वती स.नं. ६७/६८, मंदिराजवळ स्वामी रामदेव महाराज क्रिडा संकुल मधील व्यायाम साहित्य खरेदी करणेसाठी खालीलप्रमाणे र. रू. ३०/–लक्ष वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मा.स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र मआ/क्रिडा/१६३५,दि.२८/३/२०२३ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक,परिमंडळ क्र. ३<br>CE20D219/L2-11<br>नदी पुरूज्जीवन प्रकल्प राबविणे (पीपीपी/कर्ज/अनुदान/इतर वित्तीय माध्यमातून नदी व नदीकाठ विकसित करणे/ सुधारणा करणे.) | ३०,००,०००/– | ––– |
| <u>नवीन सुचविलेले काम</u><br>उपआयुक्त, परिमंडळ क्र. ३, पर्वतीस.नं. ६७/६८, मंदिराजवळ स्वामी रामदेव महाराज क्रिडा संकुल मधील व्यायाम साहित्य खरेदी करणे. | ––– | ३०,००,०००/– |

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपली.

**सही/–xxx**
**(शिवाजी दौंडकर)**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**वृत्तांत मंजूर.**

**सही/–xxx**
**(विक्रम कुमार)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**